# पतसंस्थांमधील क्रियाशील सभासद



९७ वी घटना दुरूस्ती झाली. महाराष्ट्र राज्याने सहकार कायद्यात आवश्यक दुरूस्त्या केल्या. निवडणुका संदर्भात धोरण जाहिर केले. मंत्रीमंडळाने निवडणुका संदर्भात निवडणूक प्राधिकरणाची कार्यकक्षा कमी करण्याचा निर्णय घेतल्याचे नुकतेच वाचण्यात आले आहे. अनेक सहकारी संस्थांचे उपविधी अद्यापही शासनाने इंटरनेटवर अपलोड केले नाहीत. अनेक विषयांसदर्भात सहकार खाते व शासन विरोधाभासित निर्णय करीत असल्याचे पुन्हा-पुन्हा वाचनात येते. एकंदरीत सहकाराची मुलभूत भुमिका संदिग्धरित्या जनतेसमोर येत आहे. नेमके कोणाचे काय धोरण आहे, हे कोणीच ह्या राज्यात ठामपणे व अधिकृतरित्या सांगू शकत नाही. बाब केवळ संभ्रमावस्था करणारी नसून, कायद्याची अंमलबजावणी वेळेत करणाऱ्या व्यवस्थेची आम जनता वाट बघत असल्याचे सर्वत्र चित्र दिसते.

ज्या गृहनिर्माण सहकारी संस्थांचे १०० पेक्षा कमी सभासद आहेत, त्या संस्थांच्या निवडणुका संबंधित संस्थांनीच घ्यायच्या, असे विविध वर्तमानपत्रात नुकतेच छापून आलेले आहे. प्रसिध्दी माध्यमातून एवढा महत्त्वाचा विषय मूळ घटनेला छेद देणारा कसा काय प्रसिध्द करण्यात आला, हा भविष्यकाळातील संशोधनाचा विषय ठरणार आहे, कारण देशातील सहकारी संस्थांच्या निवडणुका संबंधित राज्य सरकारांनी त्या त्या राज्याच्या सहकार कायद्यामध्ये तरतुदी करून निवडणूक प्राधिकरणामार्फतच घेणे अनिवार्य केलेले आहे. अशा परिस्थितीत १०० पेक्षा कमी सभासद असलेल्या गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या निवडणुका **निवडणूक प्राधिकरणाशिवाय** कशा होऊ शकतात? एवढेच नव्हे तर, ज्या अन्य सहकारी संस्था ज्यांची सभासद संख्या १०० च्या आत आहे, मग त्या सहकारी संस्थांना हा निर्णय लागू का नाही? याचे उत्तर मात्र वाचनात आले नाही. करमणुकीच्या

विषयासारखे भाष्य करणे व प्रसार माध्यमातून ते छापणे किंवा छापून आणणे, याला सर्वसामान्य जनता बळी पडल्याचे चित्र दिसते.

अशा परिस्थितीत सहकारी संस्था व त्यामधील कार्यकर्त्यांनी जागृक राहणे आवश्यक आहे. पतसंस्थांमधील कार्यकर्त्यांची तर मोठी सजगता असणे आवश्यक आहे. पतसंस्था नोंदणीच्या वेळी नोंदविण्यात आलेले सभासद व तद्‌नंतर नोंदविलले सभासद, ज्यांनी पतसंस्थेच्या कुठल्याही कारभारात सहभाग घेतला नाही, उदा. कर्ज घेणे, जामीनदार राहणे, ठेव ठेवणे, वार्षिक सभेस उपस्थित राहणे अशा सभासदांच्या बाबतीत आपल्याला नंतर विचार करता येईल. परंतु जे वरील कारणास्तव सक्रिय सभासद आहेत, त्यांचेशी पतसंस्थांनी त्वरीत सर्व माहितीसह जवळीक साधणे आवश्यक आहे. संबंधित सक्रिय सभासदाचा मोबाईल क्रमांक, दुरध्वनी क्रमांक, आधार कार्ड नंबर, पॅनकार्ड नंबर, बँक खाते तपशील, थोडक्यात के.वाय.सी. (K.Y.C.) अपडेट करणे आवश्यक आहे. आणि येथून पुढे किमान आपल्या सक्रिय सभासदांना कर्ज, कर्जाची जामिनकी, कर्जाची परतफेड, ठेव, ठेवीवरील व्याज, भरणा रक्कम किंवा विड्रॉवल यासंदर्भात **मॅसेजिंग सिस्टिम** अंमलात आणणे आवश्यक आहे. आता पतसंस्थांनी ऑफलाईन ऐवजी ऑनलाईन कार्यपध्दती अवलंबणे आवश्यक आहे. कारण देशभरात बँकिंग सेवांच्या वापरात सकारात्मक वाढझाल्याचे चित्र समोर आलेले आहे.

आपल्या संपुर्ण भारतात सर्व सामान्यांपर्यंत अधिकृत वित्तीय सेवा पोहोचवण्यावर भारतीय रिझर्व्ह बँकेने भर दिलेला आहे. गेल्या ३ वर्षात बँकिंग सेवेतील वाढही दिवसेंदिवस वाढल्याचे दिसते. वित्तीय संस्थांच्या शाखा, कर्ज आणि ठेवी यांचा विस्तार मोठ्या प्रमाणात वाढलेला दिसतो. देशातील सर्व ३५ राज्यातील सर्व ६३८ जिल्ह्यांमध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेने व केंद्रीय अर्थ मंत्रालयाने फार आशादायक आकडेवारी जाहीर केलेली आहे.

महाराष्ट्र राज्यात २६.५ टक्क्यांनी बँक खात्यांची संख्या वाढलेली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने पुणे, वर्धा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नागपूर ह्या जिल्ह्यांनी राष्ट्रीय सरासरी पेक्षा अधिक प्रगती केलेली आहे. परंतु नंदुरबार जिल्हा हा मागे राहिलेला आहे. तसेच बँक खाती, ठेवी आणि कर्ज यामध्ये मुंबईमध्ये तुलनेने वाढमात्र समाधानकारक नाही. देशभरात ह्या वाढीचे प्रमाण ५.६ टक्के तर मुंबईत ३ टक्के राहिलेले आहे. ही बाब मुंबईतील वित्तीय संस्थांना आव्हानात्मक असून छोट्या-छोट्या पतसंस्थांमधून देखील मदत घेणे आवश्यक आहे.

भारतात ७ पैकी १ व्यक्तीने कर्ज काढले आहे व २ व्यक्तींपैकी एकाचे बँकेत खाते आहे. भारतात ७० कोटी ३० लाख लोकांचे बँकेत खाते असून, १८ कोटी ३० लाख लोकांनी वित्तीय संस्थांमधून कर्ज घेतले आहे.

वरील आकडेवारीवरून आपल्या लक्षात येईल की, भारतीय रिझर्व्ह बँक व केंद्रीय वित्त मंत्रालय यांच्या आर्थिक विस्तार करण्याच्या मोहिमेत पतसंस्थांनी सुध्दा आपल्या सभासदांना बँकींग प्रवाहात नेण्यासाठी आपापल्या स्तरावर किमान सक्रिय सभासदांच्या माध्यमातून कार्यक्रम आखणे व त्याची नियमीतपणे अंमलबजावणी करणे हे अत्यावश्यक आहे. प्रत्येक पतसंस्थेचा सभासद व त्यातील प्रामुख्याने सक्रिय सभासद हा पतसंस्थेच्या दैनंदिन कारभारामध्ये क्रियाशील भागीदार होणे गरजेचे आहे. त्यासाठी ९७ व्या घटना दुरूस्तीचा चांगला उपयोग पतसंस्थांच्या आर्थिक स्थैर्यासाठी होऊन त्याचा सुपरिणाम पतसंस्थेच्या व एकंदरीत राज्य तसेच देशाच्या आर्थिक सुबत्तेवर सुध्दा निश्चितपणे होऊ शकतो. आणि ह्याच सुसंधीची वाट सहकारातील कार्यकर्त्यांनी ह्यापुर्वी बघितली होती, ती हळूहळू फलद्रुप होताना दिसते.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**